# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक-२.

रजि. ऑफीस : आदिवासी विकास भवन, २ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ०२२.

दूरध्वनी ०२५३ २३१५८६० फॅक्स (०२५३) २३१५८६० Mail :- shabarinsk@gmail.com


जा.क्र.शआविविम/प्रकल्प/१०५८/२०२४

नाशिक २ दिनांक २६/०७/२०२४.

# जाहिरात

आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी/ समूह/ सह. संस्था/ वनधन केंद्र/ ग्राम संघ/ फेडरेशन/ ग्राम सभा इत्यादी यांना शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे मार्फत योजना राबवयाची असल्यास त्यांनी https://www.mahashabari.in/ या संकेतस्थळावरील "नवीन बातम्या" अंतर्गत "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक - Advertisement for seeking proposals from FPOs under State Scheme" यावर अधिकची माहिती उपलब्ध करून घेऊन shabarilivelihoods@gmail.com या ई-मेल किंवा वरील पत्त्यावर पोस्टाने **दि. १८ ऑगस्ट २०२४** पर्यंत छाननीसाठी सविस्तर प्रकल्प प्रस्ताव (Detail Project Report) पाठवावे असे आवाहन करण्यात येत आहे.

(लीना बनसोड, भा.प्र.से.)
व्यवस्थापकीय संचालक
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,
नाशिक

# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक-२.

रजि. ऑफीस : आदिवासी विकास भवन, २ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक – ४२२ ०२२.
दुरध्वनी - ०२५३-२३१५८६० फॅक्स - (०२५३) २३१५८६० Mail :- shabarinsk@gmail.com

दिनांक: २६/०७/२०२४

**महाराष्ट्र राज्यातील आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी (FPC)/आदिवासी सह. संस्था (Co. op)/ FRA कायद्यांतर्गत ग्राम सभा/ग्राम सभांचे समूह/ बचत गटांचे ग्राम संघ/फेडरेशन/ वनधन केंद्र/कृषी विभागामार्फत आत्मा (ATMA) अंतर्गत असलेले आदिवासींचे गट यांचे कडून सविस्तर प्रकल्प प्रस्ताव मागविणे बाबत.**

आदिवासी समाजाच्या विकास व उन्नती साठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/का.-३ मुंबई दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये करण्यात आलेली आहे. शबरी महामंडळाचा उद्देश अनुसूचित जमातीच्या व्यक्तींच्या आर्थिक विकासासाठी व कल्याणासाठी स्वतःच्या जबाबदारीवर किंवा सरकार, संवैधानिक संस्था, कंपन्या, भागीदारी संस्था, व्यक्ती यांच्या सहयोगाने किंवा अशा संघटना, अभिकरण यांच्यामार्फत कृषी उद्योग, लघु उद्योग, वाहतूक, वैद्यकीय, अभियांत्रिकी सारखा इतर धंदा/व्यवसाय, व्यापार किंवा कार्यालय यांच्या माध्यमातून योजना आखणे, प्रचलित करणे, मदत करणे, सल्ला देणे, सहाय्य करणे, वित्तीय सहाय्य करणे, संरक्षण देणे आणि अश्याप्रकारचे विविध उपक्रम हाती घेणे हा आहे. शबरी महामंडळ हे आदिवासी कुटुंबांचे कृषी, कृषी-सलग्न, वनौपज, अहिंसक वन्य मध उपज, औषधी वनस्पती, पाणलोट विकास, पर्यटन विकास, कौशल्य विकास इत्यादींवर आधारित उपजीविका वृद्धीचे कार्य करण्यास इच्छुक आहे.

राज्य शासनाकडून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचेमार्फत अनुसूचित जमातीतील लाभार्थ्यांकरिता योजना राबविणेबाबत" या योजनेनुसार निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

या योजनेची अंमलबजावणी होणेसाठी आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: आविवि-२०२३/प्र.क्र. १३८/ का.३ दिनांक १४.०३.२०२४ (संकेतांक: २०२४०३१४१५०२०७०८२४) नुसार राज्य शासनाने सूचना निर्गमित केल्या आहेत.

याकरिता आदिवासी बहुल भागातील कार्यरत आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी (FPC)/आदिवासी सह. संस्था (Co. op)/ FRA कायद्यांतर्गत ग्राम सभा/ग्राम सभांचे समूह/ बचत गटांचे ग्राम संघ/फेडरेशन/ वनधन केंद्र/कृषी विभागामार्फत आत्मा (ATMA) अंतर्गत असलेले आदिवासींचे गट etc. यांचे मार्फत कृषी व कृषी-आधारित मूल्य साखळी निर्मिती, साठवणूक व्यवस्था व शीत गृह निर्मिती, कृषी यांत्रिकीकरण, कुक्कुटपालन, शेळीपालन, मत्स्य व्यवसाय, दुग्ध उत्पादन व प्रक्रिया

व्यवसाय, वनौपज विक्री व प्रक्रिया, अहिंसक वन्य मध उपज, औषधी वनस्पती उत्पादन, पर्यटन विकास, कौशल्य विकास यांसारखे इतर उपजिविका वृद्धी विषयांवर सविस्तर प्रकल्प प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

या योजनेंतर्गत आलेले प्रस्ताव मंजूर करण्यासाठी खालील गटांना FPO समजले जाईल.

१. कंपनी कायदा अंतर्गत तयार झालेली आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी(FPC).
२. महाराष्ट्र राज्याच्या सहकार कायद्यांतर्गत निर्माण झालेली आदिवासी सहकारी संस्था (Tribal Co-operative).
३. केंद्रशासनाच्या कायद्यांतर्गत तयार झालेली Multi State Tribal Co-operative.
४. FRA कायद्याअंतर्गत काम करणाऱ्या आदिवासी ग्राम सभा व ग्राम सभांचे समूह.
५. वन धन केंद्र.
६. माविम व उमेद: एमएसआरएलएम अंतर्गत कार्यरत असलेले स्वयं सहायता बचत गटांचे ग्राम संघ/ फेडरेशन.
७. कृषी विभांतर्गत स्थापन झालेले आत्माचे शेतकरी गट.
८. याव्यतिरिक्त इतर कायद्यांतर्गत किंवा इतर विभांतर्गत तयार झालेले आदिवासींचे गट.

बऱ्याचदा आर्थिक दृष्ट्या व्यवसाय करतांना गट तयार करत असतांना एकाच जमातीचे सर्व सदस्य राहत नाहीत, वर उल्लेख केलेल्या गटांमध्ये ८०% सदस्य अनुसूचित जमातीचे व उर्वरित २०% सभासदांपैकी बहुतांश सभासद मागासवर्गीय असावेत. प्रस्ताव सादर करणाऱ्या आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी (FPC)/आदिवासी सह. संस्था (Co. op)/ FRA कायद्यांतर्गत ग्राम सभा/ग्राम सभांचे समूह/ बचत गटांचे ग्राम संघ/फेडरेशन/ वनधन केंद्र/कृषी विभागामार्फत आत्मा (ATMA) अंतर्गत असलेले आदिवासींचे गट यांचे मध्ये कमीत कमी १०० सभासद असणे आवश्यक आहेत.

**सविस्तर प्रकल्प प्रस्ताव सादर करावयाचे विषय –**

**१) कृषी व कृषी-सलग्न**

- हवामान आधारित शाश्वत शेती पद्धतीचा व आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उत्पादन खर्चात बचत करून जास्तीत जास्त उत्पादन क्षमता वाढविणे
- कच्च्या मालाची साठवणूक करून एकत्रितपणे घाऊक बाजारपेठेत मालाची वाहतूक व विक्री
- शेतमाल / कच्च्या मालावर प्रक्रिया उद्योग जसे राईस मिल, दाल मिल, तेल काढणी यंत्र, प्रतवारी युनिट इत्यादीसारखे

- शेतमाल व प्रक्रिया केलेल्या मालाचे ब्रान्डींग करून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वितरण/विक्री.
- शेतमाल व प्रक्रिया केलेला माल साठवणुकीसाठी गोडाऊन बांधणे
- कृषी यांत्रिकीकरण
- सूक्ष्म सिंचन पद्धती
- शेतमाल व प्रक्रिया केलेल्या मालासाठी शीत गृह साखळी उभारणे
- नाशवंत शेतमालासाठी सौर वळवणी यंत्र
- शेती व शेती आधारित उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करणे
- पारंपारिक जातींचे बियाणे संवर्धन व वृद्धी
- वृक्ष संवर्धन, वृक्ष लागवड व रोपवाटिका
- जैव-विविधता

**२) कुकुटपालन**

याकरिता परसातील कुक्कुटपालन (Backyard Poultry) आणि व्यावसायिक कोंबडी पालन (Commercial Cage Poultry Farm) बाबतचे प्रस्ताव सादर करू शकतात. यामध्ये पुढील बाबींचा समावेश करता येईल.

- कुक्कुटपालन शेड बांधणे
- पक्षींचा पुरवठा करणे
- आधुनिक अंडी उबवणी कक्ष (Poultry Hatchery)
- मदर युनिट (Mother Unit)
- प्रजनन फार्म (Breeding Farm)
- स्थानिक जातींचे संवर्धन व वृद्धी (Local Breed)
- लसीकरण व रोग निर्मुलन (Vaccination & Diseases Management)
- पोल्ट्री खाद्य निर्मिती (Poultry Feed)
- अंडी उत्पादन व विक्री
- पक्षी खरेदी व विक्री

**३) शेळीपालन**

- शेळी पालनाच्या आधुनिक पद्धती
- शेळी व बोकड यांचा पुरवठा
- स्थानिक जातींचे संवर्धन व वृद्धी (Local Breed)
- लसीकरण
- विमा संरक्षण

- शेळीसाठी निवारा (Goat Shed)
- पशुवैद्यकीय सेवा पुरविणे
- खाद्य निर्मिती व पुरवठा
- शेळीपालनासाठी लागणारे हर्बल औषधी निर्मिती व विक्री
- मेमना नर्सरी
- लेंडी खत निर्मिती व विक्री
- शेळीचे दुध खरेदी व विक्री
- शेळीच्या दुधापासून विविध पदार्थ बनविणे व त्याची विक्री (Goat milk & byproducts)
- शेळी विक्री साठी मूल्य साखळी तयार करणे

**४) दुग्ध उत्पादन व प्रक्रिया उद्योग**

- गाय व म्हैस पालनाच्या आधुनिक पद्धती
- चारा उत्पादन, साठवणूक व विक्री
- पशुवैद्यकीय सेवा पुरविणे
- पशुखाद्य निर्मिती व पुरवठा
- लसीकरण
- विमा
- जनावरांसाठी गोठा बांधणे व दुरुस्ती
- दुग्धजन्य पदार्थ निर्मिती व विक्री

**५) मत्स्य व्यवसाय**

- मत्स बीज निर्मिती व विक्री (Fish Hatchery)
- गाव तलाव, मोठे तलाव, पाझर तलाव, सिंचन तलाव, धरण, नदी या सारख्या जलाशयात मत्स्य पालन करणे
- शेततलावातील मत्स्य पालन
- पिंजरा पद्धतीने मत्स्यपालन (Cage Fishery)
- हापा व मत्स्य नर्सरी (Hapa & Fish Nursery)
- मत्स्य खाद्य निर्मिती व विक्री
- मत्स्य पालन व विक्री करण्यासाठी लागणारे साहित्य जसे जाळे, होडी (Boat), जेकेट (Jackets), शीत पेटी, वाहन इत्यादी
- बायो फ्लोक (Bio Floc)
- जिवंत मासोळी विक्री
- माश्यापासून विविध खाद्य पदार्थ बनविणे व त्यांची विक्री

- शोभिवंत मस्त्य पालन
- शिंपल्यातील मोती पालन
- कोळंबी उत्पादन व विक्री

**६) वनौपज विक्री व प्रक्रिया उद्योग**

- वनौपज गोळा करून त्यांची सामुहिक विक्री करणे
- वनौपजावर आधारित प्रक्रिया उद्योग जसे तेल घाणी, वनौषधी निर्मिती, अन्न प्रक्रिया उद्योग इत्यादी
- साठवणूक व्यवस्था उभारणे
- वनौपज आधारित मूल्य साखळी निर्मिती
- वनौपज आधारित उत्पादनांचे पकेजिंग, ब्रांडीग, विपणन इत्यादी

**७) अहिंसक मध उपज**

याकरिता जंगलातील/वन्य मध गोळा करून त्याची विक्री (Forest/Wild Honey) आणि पेटीतील मध उत्पादन (Honey production in Bee Boxes) बाबतचे प्रस्ताव सादर करू शकतात. यामध्ये पुढील बाबींचा समावेश करता येईल.

- वन्य मध गोळा करणे, प्रक्रिया व विपणन बाबतचे प्रशिक्षण
- वन्य मध गोळा करणेसाठी लागणारे साहित्य
- मध प्रक्रिया युनिट उभारणीसाठी लागणारे यंत्र सामग्री
- पेटीतील मध उत्पादन, प्रक्रिया व विपणन बाबतचे प्रशिक्षण
- पेटीतील मध उत्पादन, प्रक्रिया व विपणन यासाठी लागणारे साहित्य व यंत्र सामग्री

**८) औषधी वनस्पती उत्पादन**

- औषधी वनस्पती रोप वाटिका
- औषधी वनस्पती लागवड
- प्रक्रिया व विक्री करणेसाठी लागणारे यंत्र सामग्री

**९) पर्यटन विकास**

- या प्रस्तावात आदिवासी बहुल भागात मोठ्या प्रमाणावर पर्यटनाचे आकर्षित ठिकाण आहे किंवा कसे त्याबाबतचा तपशील द्यावा.
- त्या क्षेत्रात आदिवासींची लोकसंख्या असल्यास त्याचा तपशील व ते काय करत आहेत ते द्यावे.
- आदिवासींना पर्यटनामार्फत रोजगार मिळू शकेल का? याबाबतची आपली योजना काय आहे ती द्यावी.
- योजनेसाठी लागणारा तपशील, प्रशिक्षण, साहित्य, निधी व इतर बाबी यांचा तपशील द्यावा.

**१०) आदिवासी कला व हस्तकला**

- आदिवासींच्या विविध कला यांचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार
- हस्तकला व त्यावर आधारित विविध उत्पादने निर्मिती, साठवणूक व विक्री इत्यादी.
- आदिवासी कला, हस्तकला यांवर आधारित प्रकल्प

**११) आदिवासी उत्पादने विपणन व्यवस्था उभारणे**

- आदिवासी समुदायामार्फत तयार करण्यात आलेले विविध उत्पादने निर्मिती, पॅकेजिंग, ब्रँडिंग, विपणन इत्यादी व्यवस्था उभारणे.
- आदिवासी उत्पादने यांचे विविध विपणन व्यवस्था (Marketing Platforms) द्वारे खरेदी विक्री

**वरील विषयांव्यतिरिक्त विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांवर आधारित प्रकल्प प्रस्ताव सादर केल्यास ते विचारात घेण्यात येतील.**

## प्रकल्प निहाय निधी मंजूर करण्याचे निकष :

या योजनेतून प्रकल्पांना प्रकल्पनिहाय निधी मंजूर करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबविण्यात येईल.

१. प्रत्येक प्रकल्पासाठी द्यावयाचा निधी दोन भागात विभागण्यात येईल.

२. पहिला भाग म्हणजे प्रकल्प उभारण्यासाठी लागणारी पायाभूत सुविधा उभी करणे. यंत्र सामग्री, आवश्यक बांधकाम, गोदाम उभारणी, नाविन्यपूर्ण उपक्रम, लाभार्थ्यांना देण्यात येणारे संसाधने, पशुपालन, शेळी पालन, कुक्कुट पालन, मत्स्य पालन, मधुमक्षिका पालन यांसाठी लागणारे सहाय्य, वनौपजांवर आधारित प्रकिया युनिट, विविध आदिवासी उत्पादने विक्री साठी विपणन व्यवस्था उभारणे यांसारख्या इतर अनुषंगिक बाबींसाठी लागणारा निधी आर्थिक अनुदान सहाय्य (Grant in Aid) म्हणून देण्यात येईल.

३. प्रकल्प ठिकाणी प्रस्तावित स्थापत्य विषयक बाबींसाठी (Construction & Civil Work) शबरी महामंडळाने नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकरणामार्फत (Designated Authority) मंजुरी प्राप्त करून घ्यावी.

४. दुसऱ्या भागात प्रकल्पासाठी लागणारे क्षमता बांधणी, विपणन व तांत्रिक सहाय्य (Capacity Building and Hand holding for packaging processing, branding & marketing), खेळते भांडवल (Working Capital) या सारखे इतर अनुषंगिक खर्च यांचा समावेश करण्यात येईल.

५. क्षमता बांधणी, विपणन व तांत्रिक सहाय्य (Capacity Building and Hand holding for packaging processing, branding & marketing) यांसारखे इतर अनुषंगिक

खर्चांसाठी देण्यात येणारा निधी हा आर्थिक अनुदान सहाय्य (Grant in Aid) म्हणून देण्यात येईल.

६. खेळते भांडवल (Working Capital) अंतर्गत देण्यात येणारा निधी ३ वर्षांकरिता 0% व्याजदराने उपलब्ध करून देण्यात येईल व त्यानंतर ४थ्या वर्षापासून पुढील ५ वर्ष ३% व्याज आकारण्यात येईल. मात्र प्रकल्पपरत्वे तपासणी करूनच खेळते भांडवल देण्याचा निर्णय घेण्यात येईल. खेळते भांडवलाची (Working Capital) वसुली हप्त्याहप्त्याने करण्यात येईल.

७. प्रत्येक प्रकल्पासाठी मंजूर निधी हा टप्या टप्याने देण्यात येईल. निधी वितरीत करावयाच्या पद्धतीचा उल्लेख प्रकल्प संस्थेशी करावयाच्या करारनाम्यात (MoU) करण्यात येईल.

८. प्रकल्पांतर्गत देण्यात येणाऱ्या खेळते भांडवलाची (Working Capital) परतफेड सामंजस्य करारात नमूद केलेल्या हप्त्यांनुसार न केल्यास थकीत हप्त्यांच्या रकमेवर १०% व्याज आकारण्यात येईल. तसेच आवश्यक भासल्यास संबंधित संस्थेविरुद्ध कायदेशीर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. याबाबतचे संपूर्ण अधिकार व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांना राहतील.

## <u>मंजूर प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी द्यावयाचा प्राधान्यक्रम</u> :

विहित प्रक्रियेद्वारे प्राप्त प्रकल्प प्रस्तावांची छाननी करून निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पांची निवड करतांना पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१. राज्यातील आदिवासी क्षेत्रातील स्थान सापेक्ष विशिष्ट उत्पादने, उपजिविका यांचा क्षेत्रनिहाय अभ्यास शबरी महामंडळाकडून करण्यात येईल. त्याधारे जास्तीत जास्त आदिवासी कुटुंबांची आर्थिक व सामाजिक उन्नती होणेसाठी दीर्घकालीन नियोजन करून शाश्वत व दृश्य परिणाम करणाऱ्या प्रकल्पांच्या अंमलबजावणी व विस्तार या बाबत कालबद्ध कार्यक्रम निच्छित करून त्यावर आधारित प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येईल.

२. प्रकल्पातून तयार होणाऱ्या उत्पादनांचे एकत्रीकरण, साठवण, प्रक्रिया, मानकीकरण (Standardization), पॅकेजिंग (Packaging) व विपणन यांचे एकात्मिक नियोजन (Integrated planning) देखील करण्यात येईल.

दीर्घकालीन नियोजनात पुढील बाबींना प्राधान्य देण्यात येईल.

I. सर्वात कमी मानव विकास निर्देशांक (Low HDI) असलेल्या भागातील प्रकल्प.

II. आदिम जमाती (PVTGs) व पारधी, विधवा, परितक्त्या व वैयक्तिक वनपट्टे धारक शेतकरी प्रकल्प.

III. ग्रामीण आदिवासींच्या माध्यमातून व्यवसाय केंद्र (Business Hub) तयार होतील असे प्रकल्प.

IV. आदिवासी अर्थव्यवस्थेला चालना देणारे प्रकल्प.

V. खालील उत्पादने निर्देशक स्वरुपाची आहेत. त्याव्यतिरिक्त देखील इतर उत्पादनांचा समवेश करता येईल.

a. नंदुरबार व धुळे जिल्ह्यात आमचूर, चारोळी, भगर व इतर वनौपज (NTFP) आधारित उपजीविका वृद्धी .

b. गडचिरोली, गोंदिया, यवतमाळ जिल्ह्यात महुआ व वनौपज (NTFP) आधारित उपजीविका वृद्धी.

c. ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक जिल्ह्यात आयुर्वेदिक वनौषधी व इतर वनौपज (NTFP) आधारित उपजीविकावृद्धी.

d. जुन्नर, भीमाशंकर, अहमदनगर, पुणे ह्या ठिकाणी आयुर्वेदिक वनौषधी, हिरडा, बाल हिरडा, बेहडा व इतर वनौपज (NTFP) आधारित उपजीविकावृद्धी.

e. नंदुरबार, धुळे, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, अकोले, नाशिक, ठाणे, पालघर, अहमदनगर जिल्ह्यात धान उत्पादन, त्यावर प्रक्रिया व प्रक्रिया केलेल्या मालाचे विपणन यावर भर देण्यात आलेला आहे.

f. आदिम जमाती (PVTGs), कातकरी व पारधी यांसाठी मत्स्यशेती, शेळीपालन, कुक्कुटपालन, वीटभट्टी यांसारखे उपजिविका प्रकल्प.

३. ज्या प्रकल्पांमध्ये इतर विभागांच्या योजनांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला आहे व इतर विभागही त्या प्रकल्पासाठी अर्थसहाय्य देण्यास तयार आहेत.

४. ज्या प्रकल्पांमध्ये अर्ज करणारा समूह किंवा संस्था यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन व्यवसाय सुरु केला आहे. त्यांना त्याची व्याप्ती वाढवण्यासाठी आर्थिक मदत हवी आहे व त्यांचा लाभार्थी हिस्सा पण जास्त आहे असे प्रकल्प.

५. ज्या प्रकल्पांमध्ये सहभागी सदस्यांचे मालाचा उत्पादन खर्च कमी करून, उत्पादित मालाची खरेदी करून त्यांना योग्य मोबदला दिला जातो व त्या मालावर प्रक्रिया करून त्याची मूल्यवृद्धी करून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती केली जाणार आहे.

६. ज्या प्रकल्पांमध्ये महिलांचे/आदिम जमातींचे/पारधी समुदायाचे संघटन, सक्षमीकरण करण्यास प्राधान्य देण्यात आलेले आहे.

७. ज्या प्रकल्पांमध्ये आदिवासींचे स्थलांतर थांबवण्यावर भर देण्यात आलेला आहे.

वरील नमूद केलेल्या विषयांवर कार्य करणेसाठी आदिवासी बहुल भागातील कार्यरत आदिवासी FPO यांनी सविस्तर प्रकल्प प्रस्तावासोबत आपल्या आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी (FPC)/आदिवासी सह. संस्था (Co. op)/ FRA कायद्यांतर्गत ग्राम सभा/ग्राम सभांचे समूह/ बचत गटांचे ग्राम संघ/फेडरेशन/ वनधन केंद्र/कृषी विभागामार्फत आत्मा (ATMA) अंतर्गत असलेले आदिवासींचे गट विषयीची सविस्तर माहिती मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक-४२२००२ यांचे कार्यालयात पोस्टाद्वारे अथवा shabarilivelihoods@gmail.com या ई-मेल वर दि. **१९ ऑगस्ट २०२४** पर्यत कार्यालयीन वेळेत पाठवावी.

**टिप –**

१) वरील सर्व प्रस्ताव फक्त आदिवासींकरिताच अपेक्षित आहेत.
२) प्रस्ताव सादर करणेसाठीचा नमुना सोबत **Annexure-1 ते Annexure-2** मध्ये जोडलेला आहे.
३) प्रस्तावा सोबत **Annexure-3** मध्ये नमूद केल्यानुसार संपूर्ण कागदपत्रे जोडणे आवश्यक आहेत.
४) प्रस्ताव विहित मुदतीत सादर करावा.
५) प्रस्ताव सादर करतांना त्यामध्ये आपला ई-मेल, पत्रव्यवहाराचा पत्ता, दूरध्वनी अथवा भ्रमणध्वनी क्रमांक ई. बाबी नमूद कराव्यात. ज्यायोगे आवश्यकतेनुसार आपल्याशी संपर्क साधने सुलभ होईल.
६) आपला प्रस्ताव स्वयंस्पष्ट व वस्तुनिष्ठ असणे अपेक्षित आहे. ज्यामुळे शबरी महामंडळ आपणास कशा प्रकारे मदत करू शकेल याबाबतचे नियोजन करणे शक्य होईल.
७) प्रस्ताव सादर करतांना संस्थेने त्या विषयातला पूर्वानुभव सादर करावा जेणेकरून त्याला विशेष महत्त्व देता येईल.
८) अस्तिवात असलेले Model/Projects चे विस्तारीकरण करू इच्छिणाऱ्या प्रस्तावांना विशेष महत्त्व दिले जाईल.
९) आपण सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत्यक्ष कार्यालय बोलावून, स्थळ निरीक्षण करून किंवा Social App. Network (Zoom App, Google Meet, Teams App या सारखे इतर) द्वारे

तपसणी केली जाईल. या तपासणीनंतर जे प्रस्ताव योग्य वाटतील असे प्रस्ताव सनियंत्रण समितीसमोर पुढील तपासणी व उचित कार्यवाहीसाठी सादर केले जातील.

१०) प्रस्ताव सादर करतेवेळी प्रकल्पाची गरज, उद्देश, व्यवहार्यता, खर्च अर्थशास्त्र, अपेक्षित परिणाम, आदिवासींना होणारा फायदा इत्यादींबाबतची सविस्तर माहिती द्यावी.

११) योजनेची अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खालील शासन निर्णय पाहावेत

   i) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: आविवि-२०२३/प्र.क्र. १३८/ का.३ दिनांक १४.०३.२०२४ (संकेतांक: २०२४०३१४१५०२०७०८२४) पाहावा.

   ii) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक केंद्रीय – २०२१/प्र.क्र.५७/का १९ दिनांक ३०.०७.२०२१ (संकेतांक: २०२१०७३०१७११५९५०२४)

-स्वाक्षरी -
(लीना बनसोड, भा.प्र.से.)
व्यवस्थापकीय संचालक
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,
नाशिक

## Annexure 1 – सविस्तर प्रकल्प प्रस्तावासोबत संस्थेविषयी माहिती सादर करावयाचा नमुना

*** Required**

1. Email address *

2. Name of the Organization (as per registration certificate) *

3. Name of CEO / Chairman / President *

4. Name of Manager / Managing Director *

5. Full address of Headquarter of Organization with PIN code *

6. Latest landline telephone no. with STD code *

7. Mobile no. of CEO / Chairman / President *

8. E-mail address of Organization *

9. Name of Act under which registered *

10. Year of incorporation / Registration *

11. Details of financial assistance from other agencies, if applicable

12. Details of Management Committee/Governing Body *

13. Experience of the Organization in the relevant field *

14. Available Audit Reports *

15. Other activities in which the Organization is involved *

16. Financial resources of the Organization along with bank account nos. in various banks *

17. Whether Organization is in position to run the project without assistance from Ministry of Tribal Affairs *

*Mark only one oval.*

- ⬭ *Yes*
- ⬭ *No*

18. Whether Organization has been declared bankrupt at any point of time*

*Mark only one oval.*

- ⬭ *Yes*
- ⬭ *No*

19. If so, reasons thereof

20. Whether Organization has been blacklisted by any institution of the Government at any point of time *

*Mark only one oval.*

- ( ) *Yes*
- ( ) *No*

21. If so, reasons thereof

**Program / Activity Details**

22. Name of the Program / Activity *

23. Classification of the Activity *
*Mark only one oval.*

- ( ) Education
- ( ) Health
- ( ) Agriculture, Horticulture, Animal Husbandry, Fisheries, Dairy and others in Primary Sector
- ( ) Other income generating schemes to augment tribal household economy

24. Details of the Proposed Program / Activity (in not more than 500 words)*

25. Details of Beneficiaries

26. Proposed Budget *

27. Area of Operation of the Program / Activity *
*Mark only one oval.*

- State
- District
- Region (ATC
- Region) ITDP

28. Mention the Area (as per your above selection) (Scheduled Area / ITDP area / TSP area / MADA area / Cluster) *

29. Names of target Scheduled Tribe communities going to benefited (as per Government notifications) *

30. Names of target PVTGs, if any

**Details of Infrastructure available**

31. Location of Building with complete address *

32. Type Occupancy of the building *
*Mark only one oval.*

- Owned
- Rented

33. Proof of Occupancy for the above building (Rent Agreement, Ownership document, etc.) *

34. Details of Staff employed *

35. Details of Assets Acquired *

36. Details of the Project *

(Objective of the Program / Activity, Detailed component-wise Budget, methodology of implementation of the program / activity, manpower and machinery available and required, expected outcomes, proposed timelines)

37. Brief Justification of the Project *

(Explaining how the applicant proposes to bridge the gaps to augment tribal household economy and other initiatives for improving education, health, etc.)

# Annexure २ – सविस्तर प्रकल्प प्रस्ताव सादर करावयाचा नमुना

**योजनेचे नाव (Name of Scheme)** - "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचेमार्फत अनुसूचित जमातीतील लाभार्थ्यांकरिता योजना राबविणेबाबत"

१. आदिवासी FPO चे नावं

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

२. आदिवासी FPO चा प्रकार

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

३. आदिवासी FPO चा पत्ता (Address)

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

४. ई-मेल (Email)

-----------------------------------------------------------------------------------------

५. दूरध्वनी (Contact Number)

-----------------------------------------------------------------------------------------

६. प्रस्ताव/योजनेचा विषय

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

७. सविस्तर प्रकल्प प्रस्ताव (Detail Project Proposal with all necessary documents)

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

## Annexure 3 – प्रस्तावासोबत सादर करावयाचे आवश्यक कागदपत्रांची यादी

| अ. क्र | प्रस्तावासोबत जमा करावयाची प्राथमिक कागदपत्र |
|---|---|
| 1 | FPO चे नोंदणी प्रमाणपत्र |
| 2 | पॅन कार्ड |
| 3 | Memorandum of Association, Article of Association, By Laws या पैकी जे लागू असेल ते |
| 4 | जर GST - प्रमाणपत्र असल्यास ते सादर करणे |
| 5 | अध्यक्ष व सचिव यांचे आधार कार्ड व पॅन कार्ड ( या व्यतिरिक्त संचालकांचे कागदपत्र असल्यास जोडावे ) |
| 6 | सभासद  यादी (मोबाईल/फोन नंबर सहित) |
| 7 | बँक खाते – पासबूक / कॅन्सल चेक (राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे) |
| 8 | उपलब्ध असलेले लेखापरीक्षण अहवाल (Available Audit Reports) |
| 9 | बँक अथवा खाजगी वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतले असल्यास त्याची मंजूरी पत्र  आणि परतफेड अहवाल |
| 10 | FPO च्या ताब्यात असलेली पायाभूत सुविधा (असल्यास त्याचा तपशील) |
| 11 | FPO च्या मालकीची जागा असल्यास त्या जागेचे कागदपत्र (7/12 किंवा 8 अ किंवा इतर तत्सम कागदपत्र) |
| 12 | FPO ने प्रकल्पासाठी जागा भाडे तत्त्वावर प्रस्तावित केलेली असल्यास त्याचा तपशील. (7/12 किंवा 8 अ किंवा असल्यास करारनामा) |
| 13 | FPO चे खाद्य उत्पादन असल्यास FSSAI License |

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचेमार्फत अनुसुचित जमातीतील लाभार्थ्यांकरिता योजना राबविणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : आविवि-२०२३/प्र.क्र.१३८/का.३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार भवन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- १४ मार्च, २०२४

**वाचा :-**

१) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक: केंद्रीय-२०२१/प्र.क्र. ५७/का १९ दिनांक ३०.०७.२०२१.
२) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे पत्र क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/६७७/२०२३, दि.१७.०७.२०२३.
३) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे पत्र क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/१०४५/२०२३, दि.२५.१०.२०२३.

**प्रस्तावना:-**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचेमार्फत महामंडळाच्या स्थापनेपासून आदिवासी लाभार्थ्यांकरिता स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली (राष्ट्रीय अनुसुचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली) पुरस्कृत विविध कर्ज योजना, राष्ट्रीयकृत बँक योजना तसेच सद्यस्थितीत विविध नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने शबरी महामंडळाने एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनांच्या धर्तीवर राज्य शासनामार्फत स्वयंरोजगाराच्या कर्ज योजना राबविणेकरिता वाचा येथील क्र.२ व ३ च्या पत्रांन्वये प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

तसेच शासनाचे कृषी विभाग, आत्मा, MACP, Magnet, SMART, SFSC, NABARD, PoCRA, CSR Organizations, NGOs इत्यादी यांचेमार्फत शेतक-यांचे उत्पादक कंपनी स्थापन करण्याचे कार्य केले जाते. यात मुख्यत: शेतक-यांचे गट तयार करणे, शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी करणे व त्यांना सुरुवातीला व्यवसाय करणेसाठी कांही प्रमाणात अर्थसहाय्य करणे यासारख्या बाबींवर भर दिला जातो. शासनाच्या विविध योजनांचा लाभ महाराष्ट्रातील आदिवासी कुटुंबांना मिळत नाही. याकरिता आदिवासी बहुल भागातील आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी, आदिवासींचे सहकारी संस्था, FRA कायद्यांतर्गत काम करणाऱ्या आदिवासी ग्राम सभा/ग्राम सभांचे समूह, बचत गटांचे ग्राम संघ/फेडरेशन, आदिवासींचे वनधन केंद्र इत्यादी यांना एकत्र करून

सामुहिक तत्वावर एकत्रितपणे सामुहिक विकास केंद्र, प्रक्रिया केंद्र उभारून त्यांना प्रशिक्षण, क्षमता बांधणी, व्यवसाय आराखडा तयार करणे, पायाभूत सुविधा उभारणी तसेच खेळते भांडवल इत्यादी सहाय्य करणे गरजेचे आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनांच्या धर्तीवर राज्य शासनामार्फत स्वयंरोजगाराच्या कर्ज योजना राबविणे आणि राज्यातील आदिवासी बहुल भागात आदिवासींचे शेतकरी उत्पादक कंपनी (FPC), आदिवासींचे सहकारी संस्था, FRA कायद्यांतर्गत काम करणाऱ्या आदिवासी ग्राम सभा/ग्राम सभांचे समूह, बचत गटांचे ग्राम संघ/फेडरेशन, आदिवासींचे वनधन केंद्र इत्यादी यांना प्रशिक्षण, क्षमता बांधणी, व्यवसाय आराखडा तयार करणे, पायाभूत सुविधा उभारणी तसेच खेळते भांडवल इत्यादी सहाय्य करणे या बाबी शासनाच्या विचाराधीन होत्या. याकरिता शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक: केंद्रीय-२०२१/प्र.क्र.५७/का.१९ दिनांक ३०.०७.२०२१ नुसार विशेष केंद्रीय साहाय्य व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या “Organizing Farmer Producer organization(FPO) of १५००० farmers for processing, distribution, branding and retailing” च्या धर्तीवर शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त बाबी विचारात घेऊन, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांच्यामार्फत खालील दोन योजना कार्यान्वित करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**योजना (१)** : एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली (राष्ट्रीय अनुसुचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली) यांचे धर्तीवर स्वयंरोजगारासाठी चारचाकी प्रवासी वाहन, मिनीट्रक, ट्रक, ट्रॅक्टर, मालवाहू रिक्षा, इलेक्ट्रीक रिक्षा (प्रवासी व मालवाहू) व तत्सम इ.खरेदी करण्यासाठी तसेच कृषीसंलग्न व्यवसाय, ऑटोमोबोईल व्यवसाय, हॉटेल/धाबा इ.सुरु करण्यासाठी आणि स्वयंरोजगारांतर्गत आदिवासी लाभार्थ्यांसाठी लहान उद्योगधंदे राबविणेकरिता कर्जयोजना राबविणे.

**१.१ योजनेचा उद्देश** :

१) राज्यातील अनुसुचित जमातीतील व्यक्तींची आर्थिक उन्नती करणे.

२) अनुसुचित जमातीतील व्यक्तींच्या हिताच्या दृष्टीकोनातून त्यांना स्वयंरोजगारास प्रोत्साहित करणे.

३) अनुसुचित जमातीतील व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे.

४) अनुसुचित जमातीतील व्यक्तींना व्यवसाय करण्यासाठी तात्काळ वित्त पुरवठा करणे.

**१.२ योजनेचे स्वरुप** :

१. सदर योजनेअंतर्गत राज्यातील अनुसुचित जमातीतील व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी चारचाकी प्रवासी वाहन, मिनीट्रक, ट्रक, ट्रॅक्टर, मालवाहू रिक्षा, इलेक्ट्रीक रिक्षा (प्रवासी व मालवाहू) व तत्सम इ.खरेदी करण्यासाठी तसेच कृषीसंलग्न व्यवसाय, ऑटोमोबोईल व्यवसाय, हॉटेल/धाबा इ.सुरु करण्यासाठी कर्जपुरवठा करण्यात येईल.

२. सदर योजनेअंतर्गत किराणा दुकान, चहा व थंड पेय, वडापाव नाश्ता सेंटर, पीठगिरणी, ब्युटीपार्लर, कापड दुकान, हस्तकला व्यवसाय, ज्यूस सेंटर, स्टेशनरी दुकान, कटलरी दुकान, झेरॉक्स दुकान, फोटोग्राफी व्यवसाय यासारखे विविध व्यवसाय तसेच स्थानिक पातळीवरील वाव असणारे लाभार्थ्यांच्या मागणीनुसार/पसंतीनुसार स्वयंरोजगारांच्या रु.२.०० लक्ष रकमेपर्यंतच्या व्यवसायांचा समावेश आहे.

३. सदर योजनेअंतर्गत शासनाचा सहभाग हा ९० टक्के असून लाभार्थ्याचा सहभाग १० टक्के राहणार आहे. लाभार्थ्यास द्यावयाच्या कर्जाचा कालावधी हा ५ वर्षांच्या (६० महिने) परतफेड कालावधी असून शासनाच्या सहभागांतर्गत येणारी ९० टक्के रक्कम लाभार्थ्यास कर्जस्वरुपात देण्यात यावी. सदर कर्जाची परतफेड कर्ज मंजूर केल्यानंतर लगतच्या २० त्रैमासिक हप्त्यांत करण्यात येईल.

४. व्याजदर - एनएसटीएफडीसी, नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनांसाठी आकारण्यात येणा-या व्याजदरांप्रमाणेच सदर योजनेकरिता कर्जरक्कमेवर व्याजदर आकारणी करण्यात यावी. एनएसटीएफडीसी, नवी दिल्लीमार्फत महिला सशक्तीकरण कर्जावर दसादशे ४ टक्के दराने व्याज आकारले जाते. त्याच धर्तीवर उपरोक्त नमूद परिच्छेद १.२ मधील मुद्दा २ येथे नमूद स्वयंरोजगारांतर्गत लघुव्यवसायांकरिता रु.२.०० लक्ष रकमेपर्यंतच्या कर्जावर दसादशे ४ टक्के सरळव्याज आकारले जाईल.

उपरोक्त नमूद परिच्छेद १.२ मधील मुद्दा १ येथे नमूद स्वयंरोजगारासाठी चारचाकी प्रवासी वाहन, मिनीट्रक, ट्रक, ट्रॅक्टर, मालवाहू रिक्षा, इलेक्ट्रीक रिक्षा (प्रवासी व मालवाहू) व तत्सम इ.खरेदी करण्यासाठी तसेच कृषीसंलग्न व्यवसाय, ऑटोमोबोईल व्यवसाय, हॉटेल/धाबा इ.सुरु करण्यासाठी रु.५ लक्ष पर्यंतचे कर्जावर दसादशे ६ टक्के सरळव्याज, रु.५ लक्ष ते रु.१० लक्ष पर्यंतचे कर्जास दसादशे ८ टक्के सरळव्याज तर रु.१० लक्षवरील कर्जास दसादशे १० टक्के सरळव्याज आकारले जाईल.

उपरोक्त सर्व योजनांसाठीचे व्याजदर हे एनएसटीएफडीसी, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी निश्चित केल्यानुसार राहतील.

**१.३ लाभार्थी निवडीची पात्रता** :

१) लाभार्थी अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी व अनुसुचित जमातीचा घटक असावा.

२) लाभार्थ्याची वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागासाठी उत्पन्नाची मर्यादा रु.३,००,०००/- एवढी असावी.

३) लाभार्थ्याची वयोमर्यादा १८ वर्षे ते ४५ वर्षे यादरम्यान असावी.
४) एका वेळी कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल.
५) अर्जदार महामंडळाच्या कोणत्याही (केंद्र व राज्य) योजनेचा थकबाकीदार नसावा. ज्या लाभार्थ्यांनी यापूर्वी घेतलेल्या कर्जाची परतफेड केलेली नाही अशा लाभार्थ्यांना पूर्वीच्या कर्जाची परतफेड करेपर्यंत नवीन कर्जाचा लाभ घेता येणार नाही.
६) तसेच जे लाभार्थी परतफेडीच्या कालावधीच्या आत संपूर्ण कर्जाची परतफेड करतील असे लाभार्थी त्यांचा व्यवसाय वाढविण्यासाठी पुन्हा सदर योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहतील.

**१.४ अटी व शर्ती** :

१) प्रत्येक कर्ज प्रकरणात कर्जाचा निधी लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात वर्ग करण्यात येऊन त्याचवेळी कर्ज वसूलीच्या दृष्टीने लाभार्थ्यांकडून कर्जाच्या परतफेडीच्या रक्कमेचे पुढील दिनांकाचे आगाऊ धनादेश घेण्यात यावेत.
२) रक्कम रु.५ लक्षपेक्षा अधिक कर्ज योजनेसाठी एक सक्षम जामीनदार घेण्यात यावे.
३) सदर कर्जातून लाभार्थ्यासाठी निर्माण होणारी अचल मत्ता कर्जाची पूर्ण परतफेड होईपर्यंत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडे गहाण ठेवण्यात यावी. चल मालमत्ता कर्जाची पूर्ण परतफेड होईपर्यंत महामंडळाकडे तारणगहाण करण्यात यावी.
४) वाहन खरेदीच्या कर्जप्रकरणी संबंधित लाभार्थ्याकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक आहे.
५) कर्ज परतफेडीबाबत लाभार्थ्याकडून शपथपत्र घेण्यात यावे.
६) लाभार्थ्याने केलेल्या व्यवसायाचा विमा स्वखर्चाने उतरविणे तसेच दरवर्षी विम्याचे नुतनीकरण करणे बंधनकारक राहील.

**१.५. कर्ज वितरण कार्यपद्धती** :

एनएसटीएफडीसी, नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना राबविणेकामी राबविण्यात येणा-या कार्यपद्धतीप्रमाणेच online पद्धतीने सदर योजनेची कार्यपद्धती राबविण्यात यावी. शाखा कार्यालय स्तरावर संबंधित कार्यक्षेत्रातील प्रकल्प अधिकारी हे मुल्यमापन समितीचे अध्यक्ष राहतील. सदर योजनेसाठी प्राप्त प्रस्तावानुसार शाखा व्यवस्थापक, शबरी महामंडळ यांनी आयोजित बैठकीस संबंधित प्रकल्प अधिकारी उपस्थित राहून योग्य व पात्र लाभार्थीची निवड होणेकामी इच्छूक उमेदवारांची कागदपत्रे व पात्रता पडताळणी करतील. तसेच कर्ज परतफेड करु शकणा-या लाभार्थीचा मुल्यमापन समितीचे शिफारशीने महामंडळाच्या मुख्य कार्यालयास प्रस्ताव सादर करतील. महामंडळाच्या मुख्य कार्यालयास प्राप्त झालेल्या संबंधित लाभार्थ्यांच्या प्रस्तावास मुख्य कार्यालयाकडून मंजूरी देण्यात येईल. कर्ज मंजूरीच्या प्रस्तावांची छाननी करताना खालील बाबी विचारात घेणे अनिवार्य राहील.

(अ) उद्योग/व्यवसायाची वर्धनक्षमता

(ब) लाभार्थ्याची सक्षमता/व्यवसायाचे ज्ञान

(क) परतफेडीची क्षमता/जामीनदारांची क्षमता

(ड) वैयक्तिक वनहक्क /वन पट्टे धारक (IFR) पात्र लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

**१.६ कर्ज वसूली कार्यपद्धती** :

१) कर्जाची परतफेड ही कर्ज वितरित केल्याच्या ९० दिवसानंतर सुरु करण्यात येईल.

२) कर्ज वितरणावेळीच कर्ज परताव्याचे २० त्रैमासिक हप्ते ठरवून द्यावेत व कर्ज वसूलीच्या दृष्टीने लाभार्थ्यांकडून पुढील दिनांकाचे आवश्यक आगाऊ धनादेश घेऊन तसेच ECS (Electronic Clearance System) पद्धतीने वसूली करण्यात यावी.

३) कर्जाची वसुली न झाल्यास महामंडळाकडे ठेवलेल्या तारण तसेच जामीनदारांद्वारे कर्ज वसुली करण्यात यावी.

**योजना (२)** राज्यातील आदिवासी बहुल भागात आदिवासींचे शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) स्थापन करुन त्यांना तसेच वनधन केंद्रे, आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, माहिला बचत गट, स्वयंसहाय्यता गट यांना प्रशिक्षण, क्षमता बांधणी, व्यवसाय आराखडा तयार करणे, पायाभुत सुविधा उभारणी तसेच खेळते भांडवल इत्यादीकरिता अर्थसहाय्य करणे.

**२.१. योजनेचे स्वरुप** :

सदर योजनेअंतर्गत पुढील ३ वर्षांमध्ये १८००० आदिवासी लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्याचे उद्दिष्ट आहे. यात मुख्यतः आदिवासी बहुल भागात आदिवासींचे शेतकरी उत्पादक कंपनी (FPC), आदिवासींचे सहकारी संस्था, FRA कायद्यांतर्गत काम करणाऱ्या आदिवासी ग्राम सभा/ग्राम सभांचे समूह, बचत गटांचे ग्राम संघ/फेडरेशन, आदिवासींचे वनधन केंद्र, कृषी विभागामार्फत आत्मा (ATMA) अंतर्गत असलेले गट तसेच इतर कायद्यांतर्गत तयार झालेले आदिवासींचे गट इत्यादी यांना सदर योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात येऊन लाभ देण्यात येईल.

२.२ **अंमलबजावणी कार्यपद्धती** :

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक: केंद्रीय-२०२१/प्र.क्र. ५७/का.१९ दिनांक ३०.०७.२०२१ नुसार प्राप्त प्रस्तावांचे मुल्यांकन करुन मंजूर प्रस्तावांना अर्थसहाय्य देण्यात येईल.

**२.३ लाभार्थी निवडीचे/योजना अंमलबजावणीचे निकष :**

सदर योजनेस शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत वृत्तपत्रांमध्ये व संकेतस्थळांवर योजनेची प्रसिद्धी देऊन आदिवासींचे शेतकरी उत्पादक कंपनी (FPC),

आदिवासींचे सहकारी संस्था, FRA कायद्यांतर्गत काम करणाऱ्या आदिवासी ग्राम सभा/ग्राम सभांचे समूह, बचत गटांचे ग्राम संघ/फेडरेशन, आदिवासींचे वनधन केंद्र इत्यादी यांचे कडून प्रकल्प प्रस्ताव प्राप्त करुन लाभार्थी निवडण्यात येतील.

३. सदर दोन्ही योजनांसाठी "मागणी क्र.टी-५, (०१)(१०) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाला वित्तीय सहाय्य (२४२५ १३५९) अर्थसहाय्य ३३" या लेखाशीर्षाअंतर्गत अर्थसंकल्पित तरतुदीमधून निधी वितरित करण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय दि.११.०३.२०२४ रोजी मा.मंत्रीमंडळ बैठकीत प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०३१४१५०२०७०८२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVINDRA PANDURANG GOTE

Digitally signed by RAVINDRA PANDURANG GOTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=e75cc5200718ed95cdaddfc5fd84083c61cde15d23a37121fc5c0d8a9b8aa570, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7960C9C78304EF81EAD51B7089DEE1276E179786265A30EC3B2330971AA45C51, cn=RAVINDRA PANDURANG GOTE
Date: 2024.03.14 15:12:13 +05'30'

**(रविंद्र गोटे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नाशिक.
१४. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक.
१५. सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई
१६. वित्त विभाग (व्यय-१४), मंत्रालय, मुंबई.
१७. निवडनस्ती, कार्यासन-३, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

सन २०१८-१९ व २०१९-२० या आर्थिक वर्षात विशेष केंद्रीय सहाय्य व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत मंजूर 'Organizing FPOs of १५००० farmers for processing, distribution, branding and retailing" या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांस मंजुरी देणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: केंद्रीय-२०२१/प्र.क्र. ५७/का १९**
**मंत्रालय, मुंबई- ४०००३२**
**तारीख:- ३०/०७/२०२१**

**संदर्भ:-**

१. जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०४/२०१८-Grants,दि.२१/०६/२०१८
२. जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०१/२०१९-Grants,दि.२८/०२/२०१९
३. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक यांचे पत्र क्र. शआविविम/प्रकल्प/प्रशा/१६५/२०२१, दि. १/०६/२०२१

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत व अदिम जमाती विकास कार्यक्रम या योजनाअंतर्गत राज्य शासनास अनुदान प्रदान होत असते.

२. केंद्र शासनाकडून 'Organizing FPO s of १५००० farmers for processing, distribution, branding and retailing" या योजनेस सन २०१८-१९ व २०१९-२० या वर्षात विशेष केंद्रीय सहाय्य व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत एकूण रू. ८७६०.०० लक्ष निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

३. राज्यात सद्यस्थितीत आदिवासी शेतकरी त्यांचे शेती उत्पादन वैयक्तिकरित्या व्यापाऱ्यांना किंवा प्रक्रीया उद्योगांना विक्री करतात. याकरिता सहकारी तत्त्वावर एकत्रितपणे सामूहिक विकास केंद्राचे मदतीने सदर शेत मालाचे उत्पादन, प्रक्रीया व विक्री केल्यास आदिवासी शेतकऱ्यांना चांगली किंमत/भाव मिळून फायदा होऊ शकतो.

४. शबरी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांच्या द्वारे आदिवासी शेतकऱ्यांना एकत्र करून शेतकऱ्यांची सहकारी संस्था/कृषि उत्पादकांचा संघ/सामूहिक विकास केंद्र स्थापन करुन आदिवासी शेतकरी सहकारी संस्थेतील शेतक-यांना प्रक्रिया व पॅकेजिंग इत्यादी करिता मदत करणे आणि त्यांच्या एकत्रित जमा केलेल्या शेत उत्पादनांची विक्री चांगल्या योग्य दराने करणे, याकरिता 'Organizing FPOs of १५००० farmers for processing, distribution, branding and retailing" या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांना मंजुरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाकडून 'Organizing FPOs of १५००० farmers for processing, distribution, branding and retailing" या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०१८-१९ व २०१९-२० या आर्थिक वर्षात विशेष केंद्रीय सहाय्य व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत एकूण रू.८७६०.०० लक्ष निधी मंजूर करण्यात आलेला आहे. या योजनेची अंमलबजावणी शबरी आदिवासी वित्त व विकास

महामंडळ मर्या, नाशिक यांचे मार्फत करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक -१ नुसार मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजना सोबतच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतुदीच्या मर्यादेत राबविण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नासिक यांनी त्वरित कार्यवाही करावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०७३०१७११५९५०२४ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Vijay Waje

Digitally signed by Prakash Vijay Waje
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1b4b695a8c26d140fc5c049d281eedbf23beed9a89ad7526416132cf28f14776, pseudonym=23F17B7ABBFC6358B3073C61D025B7893A825E98, serialNumber=400892E5E82479E4F3C8CF46538DC917B7071E979796D37178D3B709E19155AB, cn=Prakash Vijay Waje
Date: 2021.07.30 17:19:04 +05'30'

**(प्रकाश वि. वाजे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई .
२. मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई .
३. प्रधान सचिव, आदिवासी विकास, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय ,मुंबई .
४. आयुक्त ,आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
५. आयुक्त, कृषि महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक.
७. सहसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८ अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर.
९. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प .
१०. प्रतिनिधी ,ट्रायफेड
११. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई .

## योजना मार्गदर्शक सूचना
## परिशिष्ट-१

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | 'Organizing Farmer Producer organization(FPO) s of १५००० farmers for processing, distribution, branding and retailing" |
| २ | **योजनेकरीता उपलब्ध निधी** | <table><tr><th>अ. क्र.</th><th>वर्ष</th><th>योजनेचे नाव</th><th>मंजुर निधी (लाखात)</th></tr><tr><td>१</td><td>२०१८-१९</td><td>भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१)</td><td>१४४०.००</td></tr><tr><td>२</td><td>२०१८-१९</td><td>विशेष केंद्रिय सहाय्य</td><td>२४४०.००</td></tr><tr><td>३</td><td>२०१९-२०</td><td>भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१)</td><td>२४४०.००</td></tr><tr><td>४</td><td>२०१९-२०</td><td>विशेष केंद्रिय सहाय्य</td><td>२४४०.००</td></tr><tr><td></td><td></td><td>एकूण</td><td>८७६०.००</td></tr></table> |
| ३ | **योजनेतील कार्यक्षेत्र** | संपूर्ण महाराष्ट्रामधील आदिवासी उपयोजना क्षेत्र |
| ४ | **अंमलबजावणी अधिकारी** | व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, नाशिक |
| ५ | **योजनेचा हेतु / उद्देश** | आदिवासी शेतकरी उत्पादकांच्या शेतमालास सामूहिक विकास केद्रांचे सहाय्याने शेतमाल एकत्रित करुन योग्य प्रतवारी, प्रक्रिया व पॅकेजिंग करुन उचित दर मिळवून देणे. |
| ६ | **योजनेची कार्यपध्दती** | **शेतकरी उत्पादक संस्था(FPO) ची व्याख्या :-**<br>या योजनेंतर्गत प्रस्ताव मंजूर करण्यासाठी खालील नोंदणीकृत गटांना शेतकरी उत्पादक संस्था(FPO) समजले जाईल.<br>१. कंपनी कायदा अंतर्गत तयार झालेली आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी (FPC).<br>२. महाराष्ट्र राज्याच्या सहकार कायद्यांतर्गत निर्माण झालेली आदिवासी सहकारी संस्था (Tribal Co-operative).<br>३. केंद्रशासनाच्या कायद्यांतर्गत तयार झालेली Multi State Tribal Co-operative.<br>४. FRA कायद्याअंतर्गत काम करणाऱ्या आदिवासी ग्राम सभा व ग्राम सभांचे समूह.<br>५. वन धन केंद्र समूहांतर्गत स्थापन झालेले आदिवासींचे गट.<br>६. माविम व उमेद, एमएसआरएलएम अंतर्गत कार्यरत असलेले स्वयं सहायता बचत गट/ ग्राम संघ/फेडरेशन<br>७. कृषी विभागामार्फत आत्मा(ATMA) अंतर्गत स्थापन झालेले शेतकरी गट,<br>८. याव्यतिरिक्त इतर कायद्यांतर्गत किंवा इतर विभांतर्गत तयार झालेले आदिवासींचे गट.<br>ब-याचदा आर्थिक दृष्ट्या व्यवसाय करणा-या गटांमध्ये सर्वच सदस्य अनुसूचित जमातीचे नसतात. त्यामुळे अशा गटांमध्ये किमान ८० % सदस्य अनुसूचित जमातीचे व उर्वरित २०% सभासदांपैकी बहुतांश सभासद मागासवर्गीय असावेत. |

| | | |
|---|---|---|
| | | **योजनेची प्रसिद्धी :-**<br>१. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, नाशिक यांचे मार्फत महाराष्ट्रातील सर्वाधिक खपाच्या दोन मराठी वृत्तपत्राच्या सर्व आवृत्यांमध्ये पुरेशी प्रसिद्धी देवून वरील नमूद संस्थांकडून प्रस्ताव (Expression of Interest / Proposals) मागविण्यात येतील.<br>२. सदर प्रस्ताव शबरी महामंडळाच्या नाशिक येथील मुख्यालयात Physical व Online (ईमेलद्वारे) पद्धतीने विहित मुदतीत मागविण्यात येतील.<br>**प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्याची कार्यपद्धती :-**<br>१. प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी संनियत्रण समिती मार्फत करण्यात येईल.<br>२. अर्ज प्राप्त झाल्यानंतर एकूण प्रस्ताव व निधी मागणीचे संकलन करण्यात येईल. प्राप्त झालेल्या प्रस्तावांमध्ये प्राथमिक माहिती, उपजीविका, प्रकल्पाचे नियोजन, प्रकल्प राबविण्याबाबतची स्पष्टता व सुसाध्यता या सारख्या बाबींची तपासणी केली जाईल. जर प्रस्ताव अस्पष्ट असतील तर अतिरिक्त स्पष्टीकरण मागविण्यात येईल.<br>३. प्रस्तावांची प्राथमिक/प्रारंभिक छाननी करतांना प्रस्ताव हा ग्रामीण आदिवासी कुटुंबांच्या आर्थिक व सामाजिक उन्नती होणेसाठी आखलेल्या दीर्घकालीन नियोजनानुसार आहे की नाही याची पडताळणी केली जाईल.<br>४. प्रस्तावांची छाननी करतांना खालील बाबी तपासणे आवश्यक आहे.<br>A. अर्ज करणारा समूह किंवा संस्था हे सक्रीय आहेत किंवा नाहीत, तसेच त्याची नोंदणी शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी संस्था, स्वयं सहायता समूह किंवा शासनाच्या इतर योजनां पैकी कशात झालेली आहे.<br>B. अर्ज करणारा समूह किंवा संस्थाचे सभासद हे आदिवासी आहेत किंवा नाहीत.<br>C. ज्या उद्दिष्टांसाठी निधी मागण्यात येत आहे ते साध्य करण्याचे ध्येय कार्यरत संस्थेचे किंवा समूहाचे असणे आवश्यक आहे.<br>D. अर्ज करणारा समूह किंवा संस्था यांनी ज्या उपजीविका प्रकल्पासाठी निधी मागणी केली आहे त्याबाबत यापूर्वी काही कार्य केले आहे काय.<br>E. अर्ज करणारा समूह किंवा संस्था यांनी यापूर्वी राबविलेल्या प्रकल्पांचे यश.<br>F. अर्ज करणारा समूह किंवा संस्था हे काळ्या यादीत समाविष्ट आहेत किंवा कसे.<br>G. अर्ज करणारा समूह किंवा संस्था यांनी उत्पादित केलेल्या मालाचे प्रक्रिया व विपणनाचे कार्य केले आहे किंवा त्याबद्दल काही नियोजन केले आहे किंवा कसे, की फक्त उत्पादन वाढीवरच लक्ष केंद्रित केले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | H. अर्ज करणारा समूह किंवा संस्था यांचेकडे प्रकल्पाची अंमलबजावणी करणेसाठी पुरेसे प्रशिक्षित मनुष्यबळ, प्रशिक्षण क्षमता व इतर संसाधने आहेत किंवा कसे.<br>I. प्रकल्प कार्यक्षेत्रात प्रकल्प राबविण्यासाठी पुरेसे अनुकूल आर्थिक वातावरण आहे की नाही. नसल्यास, नियोजनाप्रमाणे वातावरण निर्माण करण्याची क्षमता संबंधित समूह अथवा संस्थेपाशी आहे किंवा कसे.<br>J. प्रस्तावित प्रकल्प क्षेत्रात समान व्यवसाय करणारे इतर प्रतिस्पर्धी कोण आहेत आणि अर्ज करणारा समूह किंवा संस्था या प्रतिस्पर्धीविरुद्ध कश्याप्रकारे उभे आहेत.<br>K. प्रकल्पासाठी योग्य Due diligence आणि आर्थिक जोखमीचे मुल्यांकन व विश्लेषन केले आहे किंवा कसे.<br>L. प्रस्तावात प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांचा उल्लेख केलेला आहे किंवा कसे.<br>M. संस्थेची वित्तीय स्थिती समजण्याकरीता संस्थेचे आयकर विवरण(ITR), सनदी लेखापालांचा अहवाल, उलाढाल यांची पडताळणी करण्यात येईल.<br>५. प्रकल्प प्रस्तावांच्या दस्तऐवजांची छाननी झाल्यानंतर संनियत्रण समिती प्रकल्पांचे मुल्यांकन करेल. यासाठी अर्ज करणारा समूह किंवा संस्था यांचेबरोबर गरजेनुसार प्रत्यक्ष अथवा ऑनलाईन बैठका, क्षेत्र भेटी, व सादरीकरण करण्यात येईल.<br>६. जर प्रकल्पाची किंमत रु. १००.०० लक्ष पेक्ष्या जास्त असेल तर स्वतंत्र एजन्सी कडून थर्ड पार्टी मुल्यांकन करून घेण्यात येईल.<br>७. थर्ड पार्टी मुल्यांकन करणेसाठी शबरी महामंडळामार्फत तांत्रिक संस्था (शासकीय/निम शासकीय/खाजगी),तज्ञ सल्लागार, शासन सेवेतील सेवा निवृत्त अधिकारी ज्यांना संबंधित क्षेत्रातील सखोल ज्ञान आहे अश्यांची निवड/नियुक्ती विहीत प्रक्रीयेद्वारे केली जाईल. शबरी महामंडळास त्यांचे मानधन ठरविण्याचे अधिकार असतील.<br>प्रकल्प अंमलबजावणी व संनियत्रणासाठी आवश्यक इतर बाबींचा सुद्धा यात समावेश असेल.<br>**मंजूर प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी द्यावयाचा प्राधान्यक्रम :-**<br>विहीत प्रक्रीयेद्वारे प्राप्त प्रकल्पांची छाननी करुन निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पांची निवड करतांना खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी-<br>राज्यातील आदिवासी क्षेत्रातील स्थान सापेक्ष विशिष्ट उत्पादने, उपजीविका यांचा क्षेत्रनिहाय अभ्यास शबरी महामंडळाकडून करण्यात येईल. त्याआधारे जास्तीत जास्त आदिवासी कुटुंबांची आर्थिक व सामाजिक उन्नती होणेसाठी |

| | | |
|---|---|---|
| | | दीर्घकालीन नियोजन करुन शाश्वत व दृश्य परिणाम करणा-या प्रकल्पाच्या अंमलबजावणी व विस्तार या बाबत कालबद्ध कार्यक्रम निश्चित करुन त्यावर आधारित प्रकल्पांना प्राधान्य देण्यात यावे. सदर नियोजन करतांनाच प्रकल्पांतून तयार होणा-या उत्पादनांचे एकत्रिकरण, साठवण, प्रक्रिया , मानकीकरण(Standardization), पॅकेजिंग व विपणन यांचे एकात्मिक नियोजन(Integrated planning) देखील करण्यात यावे.<br>अ. **दीर्घकालीन नियोजनात सर्वसाधारणपणे पुढील बाबींना प्राधान्य** देण्यात यावे.<br>(१) सर्वात कमी मानव विकास निर्देशांक (Low HDI) असलेल्या भागातील प्रकल्प.<br>(२) आदिम जमाती (PVTGS), पारधी, विधवा/परित्यकत्या व वैयक्तिक वनपट्टे धारक शेतकरी यांचे प्रकल्प.<br>(३) ग्रामीण आदिवासींच्या माध्यमातून व्यवसाय केंद्र (Business Hub) तयार होतील असे प्रकल्प.<br>(४)आदिवासी अर्थव्यवस्थेला चालना देणारे प्रकल्प<br>(५) खालील उत्पादने निर्देशक स्वरुपाची आहेत. त्याव्यतिरिक्त देखील इतर उत्पादनांचा समावेश करता येईल-<br>अ)नंदुरबार व धुळे जिल्ह्यात आमचूर, चारोळी, भगर व इतर वनौपज (MFP).<br>आ) गडचिरोली, गोंदिया, यवतमाळ जिल्ह्यात महुआ व वनौपज (MFP)<br>इ)ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक जिल्ह्यात आयुर्वेदिक वनौषधी<br>ई) जुन्नर, भीमाशंकर, अहमदनगर, पुणे ह्या ठिकाणी आयुर्वेदिक वनौषधी, हिरडा, बेहडा व इतर वनौपज<br>उ) नंदुरबार, धुळे, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, अकोले, नाशिक, ठाणे, पालघर, अहमदनगर जिल्ह्यात धान उत्पादन, त्यावर प्रक्रिया व प्रक्रिया केलेल्या मालाचे विपणन<br>ऊ) आदिम जमाती (PVTGS), कातकरी व पारधी यांसाठी मत्स्यशेती, बकरीपालन, कुक्कुटपालन, वीट भट्टी यांसारखे उपजीविका प्रकल्प.<br>ए) ज्या प्रकल्पांमध्ये इतर विभागांच्या योजनांचा अभिसरण(Convergence) साधण्याचा प्रयत्न केलेला आहे असे प्रकल्प.<br>ऐ) ज्या प्रकल्पांमध्ये अर्ज करणारा समूह किंवा संस्था यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन व्यवसाय सुरु केला आहे. त्यांना त्याची व्याप्ती वाढवण्यासाठी आर्थिक मदत हवी आहे व त्यांचा लाभार्थी हिस्सा जास्त आहे असे प्रकल्प.<br>ओ) ज्या प्रकल्पांमध्ये सहभागी सदस्यांचे मालाचा उत्पादन खर्च कमी करून, उत्पादित मालाची खरेदी करून त्यांना योग्य मोबदला दिला जातो व त्या मालावर प्रक्रिया करून त्याची मूल्यवृद्धी करून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती केली जाणार आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | औ) ज्या प्रकल्पांमध्ये महिलांचे/आदिम जमातींचे/पारधी समुदायाचे संघटन, सक्षमीकरण करण्यास प्राधान्य देण्यात आलेले आहे.<br>अं) ज्या प्रकल्पांमुळे स्थलांतर थांबवण्यास मदत होईल.<br>**मंजूर प्रकल्प कार्यान्वित करण्याची कार्यपद्धती :-**<br>प्रस्तुत प्रकल्पाचे संनियत्रण करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठित करण्यात येईल-<br>१) व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक - अध्यक्ष<br>२) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक -सह अध्यक्ष<br>३) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे - सदस्य<br>४) अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक - सदस्य<br>५) संचालक, आत्मा, कृषि आयुक्तालय, पुणे - सदस्य<br>६) महाव्यवस्थापक, वित्त, शबरी महामंडळ, नाशिक - सदस्य<br>७) प्रकल्प व्यवस्थापक, शबरी महामंडळ, नाशिक - सदस्य सचिव<br>१. प्रकल्प मंजूर झाल्यानंतर प्रकल्प निहाय प्रकल्पाचे सविस्तर मार्गदर्शक सुचना (Guidelines) व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे स्तरावरून निर्गमित करण्यात येतील.<br>२. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक संबंधित संस्थांसोबत सविस्तर सामंजस्य करार (MoU) करतील. सदर करारनाम्याच्या प्रारुपास राज्यस्तरीय सुकाणू समितीची मान्यता घेण्यात येईल.<br>३. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांनी सामंजस्य करारात (MoU) नमूद केलेल्या टप्प्यांनुसार निधी वितरणाची कार्यवाही करावी.<br>४. सनियंत्रण समितीची बैठक प्रत्येक २ महीन्यानी आयोजित करण्यात येईल. समिती प्रकल्पांचा आढावा घेऊन विहित मुदतीत संबंधित संस्थेमार्फत प्रकल्पाची अंमलबजावणी करेल.<br>५. सदर प्रकल्पांतर्गत स्थापन होणा-या शेतकरी उत्पादक संस्था(FPO) चे कार्यामध्ये सुसुत्रता व समन्वय तसेच संनियत्रणासाठी व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी उत्पादक संस्थांची केंद्रस्थ संस्था(फेडरेशन) स्थापन करण्यात येईल. त्या फेडरेशन स्थापनेबाबतचा व त्यास कायदेशीर दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव स्वतंत्रपणे शबरी महामंडळाने शासनास सादर करावा. सदर प्रस्ताव सुकाणू समितीच्या मान्यतेने अंतिम करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | ६. शासनाच्या प्रचलित कार्यपद्धती व धोरणांनुसार प्रकल्प अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ यांची असेल.<br>७) व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,नाशिक यांनी प्रकल्पांतर्गत खर्च करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) शासनास प्रति वर्षी सादर करावे.<br>८) **योजनेचे मुल्यमापन शासकिय/निम शासकीय/नामांकित खाजगी अशा त्रयस्थ संस्थेकडून करण्यात येईल. मुल्यमापन संस्थेची निवड ही विहीत प्रक्रीयेद्वारे करण्यात येईल.** |
| ७ | **योजनेचा कालावधी** | प्रकल्पाच्या सविस्तर मार्गदर्शक सुचनांमध्ये नमूद केल्यानुसार असेल परंतू २ वर्षा पेक्षा जास्त नसेल. |
| ८ | **निधी वितरण कार्यपध्दती** | **प्रकल्प निहाय निधी मंजूर करण्याचे निकष :-**<br>निधीच्या उपलब्धतेनुसार व प्रकल्पांच्या स्वरुपानुसार प्रकल्पांचा प्राधान्यक्रम ठरविण्यात येईल. या योजनेतून प्रकल्पांना प्रकल्पनिहाय निधी मंजूर करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबविण्यात यावी.<br>प्रत्येक प्रकल्पासाठी द्यावयाचा निधी दोन भागात विभागण्यात यावा.<br>**अ**(१) पहिला भाग म्हणजे प्रकल्प उभारण्यासाठी लागणारी पायाभूत सुविधा उभी करणे. यंत्र सामग्री, आवश्यक बांधकाम, गोदाम उभारणी, नाविन्यपूर्ण उपक्रम, लाभार्थ्यांना देण्यात येणारे संसाधने, पशुपालन, बकरीपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधुमक्षिकापालन यांसाठी लागणारे साहित्य, वनौपजांवर आधारित प्रक्रिया युनिट यांसारख्या इतर अनुषंगिक बाबींसाठी लागणारा निधी यामध्ये समाविष्ट करावा. हा निधी आर्थिक अनुदान सहाय्य (Grant in Aid) म्हणून देण्यात यावा. या अंतर्गत देण्यात येणारा निधी अर्जदार संस्थेच्या प्रति आदिवासी सभासद रु. ७५,०००/-इतका असेल परंतू एका संस्थेस रु. ७.५० कोटीच्या मर्यादेपर्यंत असेल.<br>(२) प्रकल्प ठिकाणी प्रस्तावित स्थापत्य विषयक (Construction & Civil Work) बाबींसाठी शबरी महामंडळाने नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकरणामार्फत (Designated Authority) मंजुरी प्राप्त करून घ्यावी.<br>(३) या निधींतर्गत जे काही स्थापत्य बाबी निर्माण होतील त्या शबरी महामंडळ आदिवासी शेतकरी उत्पादक संस्था(FPO) संस्थाना ३० वर्ष दीर्घकालीन नाममात्र भाडेतत्वावर देईल. जर या स्थापत्य निर्मितीचा दिलेल्या कारणांव्यतिरिक्त इतर कारणांसाठी गैर वापर झाला तर शबरी महामंडळ सदर स्थापत्य वस्तू ताब्यात घेऊन विहीत कार्यपद्धतीचा अवलंब करुन इतर आदिवासी संस्थाना चालवण्यासाठी देतील अथवा स्वतः चालवतील. याबाबतचा स्पष्ट उल्लेख सामंजस्य कराररनाम्यात करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | **ब**(१) दुसऱ्या भागात प्रकल्पासाठी लागणारे क्षमता बांधणी, विपणन व तांत्रिक सहाय्य (Capacity Building and Hand holding for packaging processing, branding & marketing), खेळते भांडवल (Working Capital) या सारखे इतर अनुषंगिक खर्च यांचा समावेश करण्यात यावा. या अंतर्गत देण्यात येणारा निधी अर्जदार संस्थेच्या प्रति आदिवासी सभासद रु. ७५,०००/-इतका असेल परंतू एका संस्थेस रु. ७.५० कोटीच्या मर्यादेपर्यंत असेल.<br>(२) क्षमता बांधणी, विपणन व तांत्रिक सहाय्य (Capacity Building and Hand holding for: packaging processing, branding & marketing) यांसारखे इतर अनुषंगिक खर्चासाठी देण्यात येणारा निधी हा आर्थिक अनुदान सहाय्य (Grant in Aid) म्हणून देण्यात यावा<br>(३) खेळते भांडवल (Working Capital) अंतर्गत देण्यात येणारा निधी ३ वर्षाकरीता ०% व्याजदराने उपलब्ध करून देण्यात यावा व त्यानंतर ४ थ्या वर्षापासून पुढील ५ वर्ष ३% व्याज आकारण्यात यावे मात्र याबाबत प्रकरणपरत्वे तपासणी करुनच खेळते भांडवल देण्याचा निर्णय घेण्यात यावा.<br>९. खेळते भांडवलाची (Working Capital) वसुली हत्याहत्याने करण्यात यावी. वसुलीचे हप्ते व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांनी ठरवावे.<br>प्रत्येक प्रकल्पासाठी मंजूर निधी हा सुरुवातीला संपूर्ण न देता टप्या टप्याने देण्यात यावा. निधी वितरीत करावयाच्या पद्धतीचा उल्लेख संस्थेशी करावयाच्या करारनाम्यात (MoU) करण्यात यावा. |
| ९ | **योजनेचे सनियंत्रण व मुल्यमापन, पर्यवेक्षण** | सदर योजनेबाबत धोरणात्मक बाबी उद्भवल्यास त्यावर निर्णय घेण्यासाठी सचिव (आ.वि) यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येईल. सदर समितीची रचना खालील प्रमाणे असेल-<br>१.सचिव, आदिवासी विकास - अध्यक्ष<br>२. आयुक्त, कृषि - सदस्य<br>३. आयुक्त, आदिवासी विकास - सदस्य<br>४. उप सचिव, केंद्रीय योजना, आ.वि.वि. - सदस्य<br>५. ट्रायफेड प्रतिनिधी - सदस्य<br>६.विषय तज्ञ - आमंत्रित सदस्य<br>७.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ - सदस्य सचिव<br>सदर समितीची बैठक प्रत्येक ६ महीन्यानी आयोजित करण्यात येईल. समितीमध्ये आवश्यकतेनुसार सदस्य/तज्ञ यांना समाविष्ट करण्याचे अधिकार समितीस राहतील. |